ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

**No,CGRF/AZ/R/110/2008/31/ Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer, O&M Rural Circle,**
**M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub **:- Forwarding of grievance in respect of Shri Vinayak Bandu Khandale, Samtanagar,(Shikshak Colony, Near Maroti Mandir) Sillod Dist. Aurangabad. (Consumer No. 495510218638 ).**

**Dear Sir,**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from **Shri Vinayak Bandu Khandale, Samtanagar, (Shikshak Colony, Near Maroti Mandir) Sillod Dist.Aurangabad.**

**You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter. The hearing is fixed on 08.07.2008 at 12.00 Hours**

**You are also requested to be present along with the concerned in charge at the time of hearing.**

**Member Secretary**
**CGRF, (AZ) MSEDCL,**
Aurangabad.

**Encl: As above.**

Copy to:-
**Shri Vinayak Bandu**
**Khandale, Samtanagar,**
**(Shikshak Colony, Near Maroti**
**Mandir) Sillod**
**Dist. Aurangabad.**
**For information and take a note of hearing date and time.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/आर/११०/२००८/३१**
**तक्रार दाखल दिनांक ;-२४/०६/२००८**
**निकाल दिनांक ;- १५/०७/२००८**

**श्री विनायक बंडू खंडागळे,**
**शिक्षक कॉलनी, मारोती मंदिरासमोर,**
**समता नगर, सिल्लोड,**
**जिल्हा औरंगाबाद.**

अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार

दाखल केली आहे. अर्जदाराने केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक २४/०६/२००८ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अधिकारी, यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणने १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. व सुनावणीची तारीख दिनांक ०८/०७/२००८ रोजी ठेवण्यात आली.

१) ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

अर्जदाराने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९५५१०२१८६३८ असा आहे. त्याने जानेवारी २००८ पर्यंत बिल भरलेले आहे.त्यांना फेब्रुवारी २००८ च्या बिलात ३४०४ युनिट वापराचे व रु.२२१४२/-चे वीज बिल आकारण्यात आले. याबाबत त्यांनी महावितरण कंपनीच्या संबंधीत अधिका-याकडे तक्रार केली पण त्यांच्या तक्रारीची दखल घेतली गेली नाही म्हणुन त्यांनी मंचात तक्रार दाखल केली आहे व सुधारीत वीज बिल देण्याबाबतचे आदेश देण्याची विनंती केली आहे.

२) दिनांक ०८/०७/२००८ रोजी ग्राहक श्री व्हि. बि. खंडागळे तसेच नोडल अधिका-यांचे प्रतिनीधी श्री डि.जे. माने,सहाय्यक अभियंता, सिल्लोड आणि श्री पि.एस. चांडोक हजर होते.नोडल अधिकारी यांनी चुकीने अर्जदाराचा क्रमांक अन्य ग्राहकाच्या मिटर बदली अहवालात टाकल्यामुळे त्यांना फेब्रु.२००८चे ३४०४ युनिट वापराचे व रु.२२१४२/-चे वीज बिल आकरण्यात आल्याचे मंचात दाखल केलेल्या जबाबात म्हटले आहे.अर्जदारास देण्यात आलेले वीज बिल चुकीचे असल्याचे मान्य करून त्यांनी कनिष्ट अभियंता, सिल्लोड यांनी केलेल्या स्थळ पाहणी अहवालानंतर सुधारीत बिलाचा तपशील तयार केला असून तो त्यांनी सुनावणीच्या वेळी मंचात दाखल केला

३) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरुन व नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीने दाखल केलल्या सुधारित बिलाचे अवलोकन केल्यावर मंचास असे आढळून येते की, अर्जदाराचे मीटर हे चालू स्थितीत असून वीज वापराची योग्य ती नोंद त्यावर होत आहे. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या ग्राहकाच्या सी.पी.एल.वरून त्यांचे जानेवारी २००८ महिन्यापर्यंत मिटरवरील नोंदीप्रमाणे वीज बिल भरलेले आहे. जानेवारी २००८ मध्ये देण्यात आलेल्या वीज बिलात मागिल रिडींग ३१९७ व चालू रिडींग ३२५६ अशी दाखविण्यात आली आहे. अर्जदाराच्या येथे दिनांक ३०/०६/२००८ रोजी केलेल्या स्थळ पाहणीच्या वेळी मिटर वरील रिडींगची नोंद ही ३६७७ अशी असल्याचे दिसून येते.यावरून अर्जदाराचे मिटर हे व्यवस्थितपणे कार्यरत असल्याचे दिसून येते व अर्जदाराचा फेब्रवारी २००८ ते जुन २००८ या काळात एकुण वीज वापर (३६७७ - ३२५६ ) ४२१ युनिट असल्याचे आढळून येते.या युनिटचे एकूण वीज बिल १३३२/- रुपयाचे आहे जे कि ग्राहकास मान्य आहे. तसेच त्वरित भरण्यासही तयार आहे. महावितरण तर्फे फेब्रवारी २००८ नंतर चुकीच्या वीज बिलाची आकारणी केल्याचे यावरून स्पष्ट होते अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार योग्य असून महावितरण कंपनी तर्फे त्यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे त्यास मंचात तक्रार दाखल करावी लागली. त्यामुळे अर्जदार हा नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

ग्राहकाच्या गा-हाण्याचे निवारण झाल्यामुळे मंच खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास सुधारीत वीज बिल ३० दिवसाच्या आत द्यावे.
२) महावितरण कंपनीने अर्जदारास रूपये २५०/- नुकसान भरपाई म्हणून द्यावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/आर/११०/२००८/३१** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री विनायक बंडू खंडागळे,**
**शिक्षक कॉलनी, मारोती मंदिरासमोर,**
**समता नगर, सिल्लोड,**
**जिल्हा औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/आर/११०/२००८/३१ गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.
सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१,**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**